# ॥ अध्याय तिसरा ॥

## ॥ श्रीगुरुदेवदत्त स्वामीसमर्थ ॥

॥ श्रीगणेश-सरस्वत्यै नमः ॥ श्रीसद्गुरवे नमः ॥ शिष्य विनवी श्रीगुरूसी । द्वितीयाध्यायीं दत्तात्रेयोत्पत्तीसी मूलपीठ गुरुसंततीसी । साद्यंत कथिलें आपण ॥ १ ॥ पुढें काय सांगा वर्तलें । कोण्या स्थानीं कवणरूपें प्रगटले मानस माझें उत्कंठित झालें । अवतारचरित्र ऐकावया ॥ २ ॥ गुरु म्हणती परमपवित्र । अत्यंत रहस्य अवतारचरित्र ऐकतां धनधान्यादि पुत्रपौत्र । चारी पुरुषार्थ लाधती ॥ ३ ॥ श्रीमद्भागवतीं प्रथमस्कंधांत । तृतीयाध्यायीं अवतारचरित्र सूतें कथिलें शौनकादि ऋषींप्रत । तेंचि सावधानें परिसावें ॥ ४ ॥ सूत सांगती ऋषिजनांतें । सृष्टीचे प्रारंभीं भगवंतें सकल चराचर विश्वोत्पत्तीतें । करावया कारणें ॥ ५ ॥ धारण केला 'पुरुषावतार' । तें पुरुषस्वरूप महत्तत्त्व अहंकार आणि पंचभूतसह तन्मात्र । इहीं उत्पन्न झालेलें ॥ ६ ॥ शब्द स्पर्श रूप रस गंध । हे पंच विषय तन्मात्रा प्रसिद्ध । यायोगें उद्भवलेलें षोडशविध । अंशांनीं युक्त असे जें ॥ ७ ॥ पंच ज्ञानेंद्रियें आणि कर्मेंदियें पंच । मन आणि महाभूतें पंच । ह्या षोडशकलायुक्त साच । सूक्ष्मभूत असा जो ॥ ८ ॥ प्रलय समुद्रीं पावूनि विश्रांति । निद्रा समाधि रूप स्थिति । करणारा जो ब्रह्मांडपति । पुरुषावतारी नारायण ॥ ९ ॥ त्याच्या नाभीरूप डोहांतील । कमलापासूनि ब्रह्मदेव सबल । जो विश्व स्रष्ट्याचा स्वामि केवल । उपजला तो परमेष्ठि ॥ १० ॥ तें भगवंताचें कैसें स्वरूप । जें निरतिशय-विशुद्धसत्त्वरूप । त्या ईश्वराचें अवयव रूप । उत्तमाधारेंकरूनी ॥ ११ ॥ विश्वरचनेचा विस्तार । कल्पिला आहे साचार । त्या स्वरूपासी योगी निरंतर । ज्ञानचक्षूंनीं विलोकिती ॥ १२ ॥ असंख्यात मुख मस्तकीं । चरण ऊरु भुज कर्ण नेत्र नासिकीं । मुकुट

कुंडलें वस्त्रेंभूषणादिकीं । शोभायमान दिसतसे ।। १३ ।। ज्या आदिनारायणापासून । ब्रह्मदेव जाहला उत्पन्न । त्या ब्रह्मदेवापासून । मरीच्यादिक ऋपि जाहले ।। १४ ।। त्या ऋपींनीं देव मनुष्यादिक । उत्पन्न केले पशुपक्ष्यादि देख । आदिनारायणाचे अवतार अनेक । जगत्कल्याणा जाहले ।। १५ ।। ब्राह्मणरूपी प्रथमावतार । धारण केला 'सनत्कुमार' । नैष्ठिक्य ब्रह्मचर्य व्रत निरंतर । साध्य करूनि आचरिलें ।। १६ ।। पाताळीं पृथ्वी नेली हिरण्याक्षानें । म्हणूनि त्या यज्ञाधिपति देवानें । उद्धरिली वराह-स्वरूपानें । दैत्यविध्वंस करूनी ।। १७ ।। त्या देवें ऋपिवंशानंतर । 'नारद' नामक तृतीयावतार । घेऊन पंचरात्रागम नामक तंत्र । कथन केलें सविस्तर ।। १८ ।। त्या वैष्णव तंत्रमार्गें कर्म । केलेलें होतें निष्काम । तें कर्म मुमुक्षुजनांस परम । मोक्षप्रद होतें हो ।। १९ ।। त्या नारायणें चतुर्थावतारीं । धर्म नामें ऋपि संतती माझारीं । 'नर-नारायण' दोन प्रकारीं । ऋपिस्वरूपें धरियेलीं ।। २०, ।। चित्त शांतताकारक । इतरांसी बहुधा-अशक्य । ऐसा तपश्चर्या मार्ग सम्यक् । नरनारायणीं दाविला ।। २१ ।। पांचवा सिद्धांचा ईश्वर । धरूनि 'कपिल' नामक अवतार । असुरि नामें ब्राह्मणांस सांख्यशास्त्र । कपिल मुनीनें कथिलें तें ।। २२ ।। ज्यांत तत्त्वांचा समुदाय । सांगितलासे यथार्थ निर्णय । तेंचि सांख्यशास्त्र म्हणती आर्य । कपिलमहामुनीचें ।। २३ ।। षष्ठावतार 'श्रीदत्तात्रेय' । योगाधीश्वर सद्गुरु अद्वितीय । ऋपि-मुनि-योग्यादिकांसी अक्षय । महादाश्रय होय जो ।। २४ ।। अलर्कराजा प्रल्हादास । यदु सहस्रार्जुन इत्यादिकांस । दत्तात्रेयें आत्मविद्या बोधूनि सुरस । कृतकृत्यता अर्पिली ।। २५ ।। ज्या प्रख्यात यदुवंशांत अवतरले श्रीकृष्ण भगवंत । त्या यदुराजासी मोक्षपद प्राप्त । दत्तात्रेयकृपें जाहलें ।। २६ ।। नंतर रुचि नामें प्रजापती पासून । आकूती भार्योदरीं उत्पन्न । 'यज्ञ' जयाचें नामाभिधान । तो सप्तमावतार जाहला ।। २७ ।। त्यानें याम नामक म्हणून । देवगणांसहवर्तमान । स्वायंभूवमन्वंतराचें संरक्षण । केलें निज पराक्रमें ।। २८ ।। अष्टमावतार 'ऋषभ' नामक

नाभिराजा ज्याचा जनक । मेरुदेवी स्त्रीचे उदरीं सम्यक् । जन्म झाला ऋषभाचा ॥ २९ ॥ गृहस्थादिक सर्वाश्रमांतील । लोकीं वंद्य धैर्य सबल । पुरुषें सेवावयासी निर्मल । योग्य ऐसा मार्ग जो ॥ ३० ॥ परमहंस योग्यांचा मार्ग । स्वयें आचरूनि यथासाङ्ग । ऋषभें जनांसी दाविला योग । पमरहंस मार्ग तो ॥ ३१ ॥ पूर्वी वेन नामें नृप । मृत्यु पावला होऊनि ऋषिशाप । तेव्हां अराजक प्रजा भय ताप । पावली ऐसें निरखुनी ॥ ३२ ॥ त्या जगदीश्वराचें स्तवन । करिती अपार ऋषिजन । तदा नारायणें 'पृथु' नामें म्हणून । नवमावतार घेतला ॥ ३३ ॥ गोरूपिणी पृथ्वीचें दोहन । त्या पृथुरायें उत्तम करून । दुग्धरूपी सर्वौषधि काढून । केली ख्याति त्रिलोकीं ॥ ३४ ॥ तैसेंचि चाक्षुष मन्वंतरांत । सकल समुद्र प्रलयकालवत् । एकत्र झाले तेव्हां तो भगवंत । 'मत्स्यावतार' घेतसे ॥ ३५ ॥ कौतुकें मत्स्यरूप धरून । पृथ्वीरूप नौकेंत बसवून । सत्यव्रत राजाचें संरक्षण । केलें दशमावतारीं ॥ ३६ ॥ तोचि राजा सत्यव्रत । पुढें जाहला मनु वैवस्वत । सूत शौनकादि ऋषीप्रत । हें कथानक सांगतसे ॥ ३७ ॥ पूर्वी देव आणि दानव । अमृताच्या प्राप्तीस्तव । समुद्रीं मंथन करीत होते जंव । तंव नवल काय वर्तलें ॥ ३८ ॥ बुडूं लागला मंदराचल । तेव्हां तो परमेश्वर दयाल । एकादशावतार प्रबल । कूर्मरूप जाहला ॥ ३९ ॥ 'कूर्मस्वरूप' करूनि धारण । तो मंदराचल पर्वत जाण । निज पृष्ठभागावरी धारण । केला सहज भगवंतें ॥ ४० ॥ तोचि पुन्हां परमेश्वर । 'धन्वंतरी' नामें द्वादशावतार । धरूनि सुरासुरांसी साचार । अमृत-कलश देतसे ॥ ४१ ॥ तो देव त्रयोदशावतारीं । 'मोहिनी' स्वरूपास धरी । चातुर्यें दानवांसि मोहित करी । देवांस अमृत पाजितसे ॥ ४२ ॥ मग त्या ईश्वरें चवदावा । धरिला 'नृसिंहावतार' बरवा । स्तंभीं प्रकटूनि सर्व देवां । प्रल्हादभक्ता संरक्षिलें ॥ ४३ ॥ ब्रह्मवरें अति दुर्जय । झालेला हिरण्यकश्यपु दैत्य । अंकीं घेऊनि तयाचें पारिपत्य । केलें भक्ताकारणें ॥ ४४ ॥ बुरूड जैसा लव्हाळ्यांचें । विदारण करितो त्यापरी साचें । नृसिंहें स्वनखांनीं

दैत्याचें। विदारण केलें क्रोधभरें ॥ ४५ ॥ नंतर श्रीहरि नारायण । करी पंधरावा 'वामनावतार' धारण । बलिराजाचें सर्वस्व हरण । करावें ऐशा हेतूनें ॥ ४६ ॥ बलिराजाच्या जाऊन मखांत । त्रिपाद भूमीची याचना करित । महादाता बलिराजा वदत । यथेप्सित घेई रे ॥४७॥ त्रय पावलांत बलिपासून । सर्वस्व घेतलें हरून । स्वर्गीचें राज्य इंद्रासि देऊन । वामनें विश्व सुखी केलें ॥ ४८ ॥ सोळावा अवतार 'परशुराम'। ब्राह्मणकुलांत घेऊनि जन्म। ब्राह्मणद्रोही नृपांसी यम- । लोकीं धाडी भार्गव ॥ ४९ ॥ ब्राह्मणांचा द्रोह करणारे दुष्ट। खल छलक राजे पापिष्ट । तन्नाशार्थ एकवीस वेळ स्पष्ट। भार्गवें निःक्षत्रिय पृथ्वी केली ॥ ५० ॥ पराशरापासून सत्यवतीचे उदरीं। 'व्यास' जन्मले सत्रावे अवतारीं। 'व्यासो नारायणः साक्षात्' हरि । परोपकारी सर्वदा ॥ ५१ ॥ अल्प मंदबुद्धीचे जन । त्यांना ज्ञान प्राप्त व्हावें म्हणून । वेदरूप वृक्षाच्या अनेक शाखा करून । रचिलीं सूत्रें भाष्यादिक ॥ ५२ ॥ अठराव्या अवतारीं नारायण। 'रामचंद्र' रूप करूनि धारण । देवकार्यार्थ सीतारमण । वानरसाह्य घेतसे ॥ ५३ ॥ कपिकरीं सेतूबंधन । करूनियां समुद्रतरण । श्रीरामचंद्रें रावण कुंभकर्ण। सहपरिवारें वधियले॥५४॥ एकुणवीस आणि वीस। हे दोन अवतार सुरस। धरूनि 'श्रीकृष्ण' 'बलराम' रूपास। कंसादिक वधियले ॥ ५५ ॥ श्रीकृष्ण आणि बलराम-। रूपें यादववंशीं घेऊनि जन्म। दावूनि लीला अद्भुत परम। भूभार हरण केला हो ॥ ५६ ॥ पुढें कलियुग प्राप्त झालें। दानव देवद्वेष करूं लागले। मग त्या देवें बुद्धरूप धरिलें। दैत्यांसी मोहित करावया ॥ ५७ ॥ एकविसावा 'बुद्धावतार'। गया प्रदेशांत साचार। बुद्धनामक जैन-पुत्र । तो भगवंत होतसे ॥ ५८ ॥ नंतर कलियुगाच्या अंतीं । अधर्मरत सकल भूपति। प्रजाधनापहारी चौर्यवृत्ति। दुराचरणी निपजती ॥ ५९ ॥ मग तो देव जगत्पालक । ब्राह्मणकुलीं विष्णुयशा नामक । द्विजभार्योदरीं 'कल्की'-अवतार देख। जगत्कल्याणा घेईल ॥ ६० ॥ कुमार नारद मनु स्वायंभुवादिक । देवत्रय सृष्टि-स्थिति-संहारकारक । महा

तेजस्वी मनुपुत्र सम्यक् । आणि कश्यपादि प्रजापति ॥ ६१ ॥ हे सकलही अवतार । त्या परमेश्वराचेचि होत साचार । आणि श्रीकृष्णावतार । तोही पूर्णब्रह्मस्वरूप असे ॥ ६२ ॥ या ईश्वरावतारचरित- । श्रवणें पठणें होय यथेप्सित । भागवतीं आद्यस्कंधीं तृतीयाध्यायांत । असे तेंचि वर्णिलें ॥ ६३ ॥ आतां ज्योतिषादिशास्त्रयुक्त । चतुर्युगोत्पत्ति बोलिजेत । अवतार कोणकोणति युगांत । जाहले तेही परिसावे ॥ ६४ ॥ अचिंत्य अव्यक्त निराकार । निर्गुण स्वरूप गुणात्मक साचार । जे समस्त जगदाधार । त्या ब्रह्ममूर्तीस नमियेलें ॥ ६५ ॥ सूर्यसिद्धांतानुसार । समस्त जगदुत्पत्ति स्थिति संहार । यासी कारण ब्रह्म साचार । परमायुर्वर्षशत बोलिलें तें ॥ ६६ ॥ चतुर्युगें सहस्त्रवेळां जाती । तेव्हां पितामहाचा दिवस म्हणती । ऐसे ब्रह्याचे दिन सहस्त्र होती । तदा विष्णूची एक घटिका ॥ ६७ ॥ ऐशा विष्णूच्या द्वादशलक्ष घटी । तेव्हां कलार्ध संख्या होते धूर्जटी । रुद्रसंख्या कलार्ध दशकोटी । तदा ब्रह्माक्षर होतसे ॥ ६८ ॥ चतुर्युगांचा ऐक्यसंयोग । त्यासी म्हणती 'महायुग' । संधि-अंशांचे वेगळे भाग । शास्त्रामाजीं कथियेले ॥ ६९ ॥ कृत त्रेता द्वापार कलि चार । ऐसीं युगें एकाहत्तर । पर्यंत एका मनूचा कालाधिकार । ते चतुर्दश मनु बोलिजेत ॥ ७० ॥ ब्रह्मदेवाच्या अहोरात्रांत । चतुर्दश मनु होऊनि जात । तयांचीं नामें परिसावींत । विधीच्या प्रथम दिवसापासून ॥ ७१ ॥ स्वायंभुव स्वारोचि उत्तम । तामस रैवत चाक्षुप षष्ठम । वैवस्वत मन्वंतर सप्तम । सांप्रत चाललें असे हें ॥ ७२ ॥ वर्तमान वैवस्वतसप्तमें । मन्वंतरें अष्टाविंशतितमे । कलियुगे चरण प्रथमे । संधौ भविष्यंति मनवः ॥ ७३ ॥ पुढें होणारे मनु सात । त्यांचीं नामें शास्त्रविहित । अनुक्रमें श्रोतीं सावधचित्त । होऊनियां परिसावीं ॥ ७४ ॥ सावर्णि दक्षसावर्णि । धर्मसावर्णि रुद्रसावर्णि । ब्रह्मसावर्णि रोच्यसावर्णि । भौत्यसावर्णि सातवा ॥ ७५ ॥ ऐसे हे मनु चतुर्दश । शास्त्रीं वर्णिले सावकाश । या ग्रंथीं तयांचा समावेश । बालबोधार्थ केलासे ॥ ७६ ॥ आतां सांगूं द्वीपप्रकारा । सप्तद्वीपा

वसुंधरा । जंबु प्लक्ष शाल्मली कुश ध्यानीं धरा । क्रौंच शाक पुष्कर ॥ ७७ ॥ ही पृथ्वी नवखंड । शास्त्रीं वर्णिलें जें अखंड । भारतवासी हो जन उदंड । श्रवण करा नामें त्यांचीं ॥ ७८ ॥ इलावृत्त भद्राश्व हरिवर्ष । केतुमाल रम्यक हिरण्मय । कुरु किंपुरुष भारतवर्ष । बोलिलीं नवखंडें वसुधा ही ॥ ७९ ॥ त्या प्रथम श्रेष्ठ जंबुद्वीपीं । ब्राह्मण क्षत्रिय वैश्यादि प्रतापी । वसती स्वधर्मरत सुस्वरूपी । हें आपणांस उमजावें ॥ ८० ॥ दशभाग जंबुद्वीपाचे । कळावे आर्य हो आम्हांस आमचे । निजशास्त्ररहस्य स्वहिताचें । कल्याणकारक समजावें ॥ ८१ ॥ कुरु चंद्र सौम्य वरुण । नाग कुमारिका ताम्रपर्ण । गभस्तिमत् कशेरु ऐंद्र हे जाण । दशभाग जंबुद्वीपाचे ॥ ८२ ॥ आतां ऐका सप्तसमुद्र मनोरम । लवण इक्षु क्षीर दधि घृत पंचम । मधुमय अमृतमय सप्तम । मुख्य जलधि हे वर्णिले ॥ ८३ ॥ आतां वर्णूं चतुर्दशलोक । अधोर्ध्व ऐका हो सकळिक । सप्तपाताल अधोलोक । तत्त्वज्ञपुरुषें कथिले कीं ॥ ८४ ॥ तल अतल वितल सुतल । तलातल रसातल । सप्तम तें म्हणिजे पाताल । हे अधोलोक निवेदिले ॥ ८५ ॥ भूर्लोक भुवर्लोक स्वर्लोक । महर्लोक पांचवा जनोलोक । तपोलोक सप्तम सत्यलोक । हे ऊर्ध्वलोक बोलिले ॥ ८६ ॥ चतुर्दशलोक कथिले वचनीं । आतां सांगूं चौऱ्यांशीं लक्ष योनि । पुराणांतरीं कित्येक स्थानीं । शास्त्रकारीं लिहिल्या ज्या ॥ ८७ ॥ नवलक्ष उदकीं जलचर । वीसलक्ष योनि स्थावर । कृमि गणत्रि लक्षरुद्र । दशलक्ष पक्षीयोनि होय ॥ ८८ ॥ पशुयोनि त्रिंशल्लक्ष । मनुष्ययोनि चतुर्लक्ष । ऐशा योनि चतुराशीति लक्ष । लक्ष्यपूर्वक जाणिजे ॥ ८९ ॥ या प्राणिमात्रांची तत्त्वतां । आयुष्यावधि बोलूं आतां । अवश्य समजावें समस्तां । गुज निजशास्त्र म्हणून ॥ ९० ॥ मनुष्यायुष्य एकशेंवीस । पंचशत वर्षें वृक्षास । तीनशें वर्षें कपीस । बत्तीस गणिलीं अश्वाचीं ॥ ९१ ॥ व्याघ्राचें आयुष्य चौसष्ट वत्सर । सर्पाचें तें एकसहस्र । कूर्माचें पंधराशें संवत्सर । पंचवीस गर्दभाचें गणियेलें ॥ ९२ ॥ एक वर्ष

श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ

पिपीलिकादिकांचें । द्वादशवर्षें श्वान-मूकराचें । पंचवीस पंचवीस अजा-मृगांचें । वृषभाचें चोवीस वर्षें ॥ ९३ ॥ सिंह-गजांचें शतवत्सर । उष्ट्राचें पंचवीस संवत्सर । पिंगलादिकांचें आयुष्य तीन सहस्र । गृध्राचें चारसहस्र बोलती ॥ ९४ ॥ एकशेंपंधरा जलधोक्षजाचें । तीनसहस्र वर्षें भेकाचें । षट्शतवत्सर आयुष्य बकाचें । पारावताचें (पारव्याचें) एकसहस्र असे ॥ ९५ ॥ वृश्चिक गोधा- (पाण्यांतील घोरपड) दिकांचें । आयुष्य गणिलें अष्ट वर्षांचें । वर्ष मास पक्ष सूक्ष्म जंतूंचें । दिन घटिकादि असतसे ॥ ९६ ॥ तडागादिक जलाशय । वापी कूपादि देवालय । इत्यादिकांचें दशसहस्र आयुष्य । शास्त्रीं वर्णिलें असे हें ॥ ९७ ॥ आतां चतुर्युगोत्पत्ति श्रवण । कराहो ज्योतिषशास्त्र प्रमाण । इतर शास्त्रांत भिन्नभिन्न । युगकल्पभेदें आढळतें ॥ ९८ ॥ कार्तिक शुक्ल नवमी । श्रवण नक्षत्रीं वृद्धियोग नामी । 'कृतयुगोत्पत्ति' प्रथम यामीं । जाहली असे निश्चयें ॥ ९९ ॥ सत्रालक्ष अठ्ठावीस हजार । कृतयुग प्रमाण संवत्सर । ह्यांत चतुष्टय झाले अवतार । मत्स्य-कूर्म-वराह-नारसिंह ॥ १०० ॥ प्रभववत्सरीं दक्षिणायनीं । कार्तिक शुक्ल त्रयोदशी चंद्रदिनीं । मृग नक्षत्रीं योगशोभनीं । 'मत्स्यावतार' अपराण्हीं जाहला ॥ १ ॥ मत्स्यरूप करूनि धारण । दुष्टदानवांचें निर्दलन । केलें जगद्धितार्थ वेदोद्धरण । नारायणें स्वलीलें ॥ २ ॥ दक्षिणायनीं शुक्लनाम वत्सरीं । श्रावण शुक्ल एकादशी गुरुवारीं । विष्कंभयोगीं मूल नक्षत्रीं । 'कूर्मावतार' सायान्हीं जाहला ॥ ३ ॥ कूर्मरूपें धरूनि अवतार । दुर्जन निशाचरांचा संहार । करूनि जगदुद्धरण भूभार । उतरिला स्वेच्छें भगवंतें ॥ ४ ॥ भाद्रपद शुक्ल तृतीयादिनीं । अपराण्हीं 'वराहरूप' धरूनी । हिरण्याक्षें पाताळीं नेली मेदिनी । उद्धार तियेचा केला हो ॥ ५ ॥ अंगिरा नामाब्दीं उदगयनीं । वैशाख शुक्ल चतुर्दशी दिनीं । मंदवारीं स्वाति-भे योग-वरियानीं । प्रदोषव्यापिनी जयंती ॥ ६ ॥ न दिवसा न निशीं ऐशा समयासी । स्तंभीं प्रगटले 'नृसिंह' रूपेंसी । निर्दलुनी हिरण्यकश्यपूसी । प्रल्हाद भक्तासी रक्षिलें

॥ ७ ॥ त्या कृतयुगीं मुळींच नसे पाप । पुण्य वीसविस्त्रे अमूप । स्वधर्मनिरत पुण्यप्रताप । एकलक्ष नरायुष्य होतें ॥ ८ ॥ मानव एकविंशति हस्तप्रमाण । द्रव्यरत्न पात्रसुवर्ण । तेव्हां ब्रह्मांडमय प्राण । पुष्करतीर्थ प्रसिद्ध असे ॥ ९ ॥ सोळाशें सूर्यग्रहणें । दशसहस्त्र चंद्रग्रहणें । स्त्रिया पतिव्रताधर्मपरायणें । विख्यात राजेही धर्मिष्ठ ॥ ११० ॥ हिरण्यकश्यपु प्रल्हाद विरोचन । बालि बाणासुरादि विद्वान् । बीज एकएकविंशति छेदन । पितराज्ञाधारक पुत्र होते ॥ ११ ॥ कपिल भद्र दक्षादि जन । नित्य निरत ब्रह्मोपासन । पौरावनीं तत्पर जाण । कृतयुगीं झाले सुकृती ॥ १२ ॥ वैशाख शुक्ल तृतीया सोमवारीं । शोभनयोगीं रोहिणी नक्षत्रीं । 'त्रेतायुगोत्पत्ति' द्वितीय प्रहरीं । शास्त्रीं असे वर्णिली ॥ १३ ॥ बारालक्ष शहाण्णव हजार । त्रेतायुगमान संवत्सर । त्रेतांत 'वामन-परशुराम-रामचंद्र'। अवतारत्रय जाहले ॥ १४ ॥ अदिति-कश्यप-पुत्र 'वामन'। धातानामवत्सरीं दक्षिणायन । भाद्रपद शुक्ल द्वादशी बुध श्रवण । मध्यान्हकालीं अवतरले ॥ १५ ॥ पंचमावतार असे वामन । भिक्षुरूपें धरणी त्रिपाददान । घेतलें बलीचें सर्वस्व हरून । वामनें विश्व सुखी केलें ॥ १६ ॥ रेणुकासुत 'परशुराम' जन्म । उदगयनीं पार्थिवाब्द नाम । वैशाख शुद्ध तृतीया रोहिणी सोम । सुकर्मयोगीं प्रदोषकालीं ॥ १७ ॥ कोणी मध्यान्ही तृतीया शुद्ध घेती । परशुरामजयंतीतें करिती । जेणें एकवीस वेळां निःक्षत्रिय जगती । पितृकैवारें केलीसे ॥ १८ ॥ संवत्सरनाम तारण । चैत्र शुक्ल नवमी उत्तरायण । भृगुवासर पुनर्वसु-भे योग-वरियाण । 'श्रीराम' मध्यान्हीं जन्मले ॥ १९ ॥ मिळवूनि वानरसैन्य । समुद्रीं सेतुबंधन करून । रावणादिक दैत्य वधून । सीता आणिली रामचंद्रें ॥ १२० ॥ त्रेतायुगीं पांच विश्वे पाप । पंचदश विश्वे पुण्य अमूप । नृशरीर चतुर्दश हस्त माप । दशसहस्त्र वर्षें आयुष्य होतें ॥ २१ ॥ त्रेतायुगीं सुवर्ण द्रव्य रौप्य पात्र । परमेश्वरलिंग पवित्र । तेव्हां अस्थिमय प्राण विचित्र । नैमिष्यारण्य तीर्थ असे ॥ २२ ॥ अठराशें सूर्यग्रहणें

जाण । चंद्रग्रहणें एकलक्ष प्रमाण । बीज एक प्रसव सप्तछेदन । त्रेतायुगीं वर्तलें ॥ २३ ॥ सूर्यवंशीं राजे धर्मकुशल विख्यात । विक्रम विश्वामित्र भगीरथ । दिलीप अज दशरथ । राम लवकुशादि जाहले ॥ २४ ॥ त्रेतायुगीं मुख्य तपोबल । वचन प्रमाण निर्मल । यज्ञयाग करिती सकल । पुण्यशील वेदवेत्ते ॥ २५ ॥ माघ कृष्ण अमावास्या शुक्रवारीं । वरीयसीं योगीं धनिष्ठा नक्षत्रीं । 'द्वापारयुगोत्पत्ति' तृतीय प्रहरीं । विद्वज्जन वर्णिती ॥ २६ ॥ आठलक्ष चौसष्ट हजार । बोलिलें द्वापार मान वत्सर । 'श्रीकृष्ण' 'बौद्ध' द्वय अवतार । द्वापार युगीं जाहले ॥ २७ ॥ दुर्मतीनामाब्दीं दक्षिणायनीं । श्रावण कृष्ण अष्टमी बुध रोहिणी । अतिगंड योगीं मध्यरजनीं । कृष्णपरमात्मा प्रगटले ॥ २८ ॥ यदुकुलभूषणप्रदीपक । श्रीकृष्ण भगवान् पूर्ण एक । वधूनि दानव कंसादिक । जीव अनेक उद्धरिले ॥ २९ ॥ दुर्मतिनामाब्दीं याम्यायनीं । पौष शुक्ल एकादशी भौमदिनीं । पुष्य-भे धृति-योगीं सायान्हीं । 'बौद्धावतार' जाहला ॥ १३० ॥ तेव्हां पापपुण्य समान । एक सहस्र मनुष्यायुर्मान । शरीर उच्च सप्तहस्त प्रमाण । द्वापार युगांत होतें कीं ॥ ३१ ॥ ताम्रपात्र रजत मुद्रा व्यवहार । प्राण रुधिरमय साचार । तीर्थ प्रसिद्ध कुरुक्षेत्र । द्वापार युगीं असे हो ॥ ३२ ॥ छत्तीसशें सूर्यग्रहणें जाण । दोनलक्ष चंद्रग्रहण प्रमाण । बीज एक प्रसव तीन छेदन । राजे परिसा सोमवंशी ॥ ३३ ॥ सोम बुध तडाग पुरूरव नृपती । अंगद पांडु युधिष्ठिर सुकीर्ति । अर्जुन अभिमन्यु भूप परीक्षिती । जन्मेजय देवखंड ॥ ३४ ॥ सहनाग शंभु वेणु जीव । विश्व कामरूपादि पार्थिव । वचन प्रमाण विपुल द्रव्य । विष्णुपूजन तत्पर असती कीं ॥ ३५ ॥ भाद्रपद कृष्ण त्रयोदशी । रविवारीं आश्लेषा नक्षत्रेसीं । व्यतिपातयोगीं मध्यरात्रीसीं । 'कलियुगोत्पत्ति' जाहली ॥ ३६ ॥ चारलक्ष बत्तीस हजार । कलियुग प्रमाण संवत्सर । 'कल्की' भविष्यावतार । असे होणार शेवटीं ॥ ३७ ॥ माघशुक्ल एकादशी रविवारीं । गंडयोगीं पुष्यनक्षत्रीं । दिवसा चतुर्थ प्रहरीं । कल्की अवतार

होईल ॥ ३८ ॥ कर्नाटकदेशीं करवीर- । पत्तनीं कल्की भविष्यावतार । आठशेंएकवीस संवत्सर । होईल शक तयाचा ॥ ३९ ॥ गौडदेशीं महाकाल देवता । सोमेश्वरलिंग तत्त्वतां । कलींत पुण्य पांचविश्वे न्यूनता । पाप पंधराविश्वे अधिक असे ॥ १४० ॥ मनुष्यायुर्बल शतवत्सर । औटहात प्रमाण शरीर । कूट द्रव्य अस्थि व्यवहार । अन्नमय प्राण असे ॥ ४१ ॥ राजे स्वधर्मकर्मरहित । मिथ्याचारी द्विज कुमार्गी रत । सर्वत्र माजेल नास्तिकमत । कलींत वसेल तीर्थ गंगा ॥ ४२ ॥ बीज एक अनेक प्रसव छेदन । अभक्ष्यभक्षक उपासक जाण । निंद्यकर्मी दुराचारी जन । होतील निश्चयें कलियुगीं ॥ ४३ ॥ कलींत षट् शककर्तार । प्रथम इंद्रप्रस्थीं युधिष्ठिर । तीनसहस्र चव्वेचाळीस संवत्सर । युधिष्ठिर शक बोलिला ॥ ४४ ॥ दुसरा उज्जनीस 'विक्रमशक'। एकशेंपस्तीस वत्सरात्मक । तृतीय प्रतिष्ठानीं 'शालिवाहन' शक । अठरा हजार वर्षें कथियला ॥ ४५ ॥ चतुर्थ वैतरणी सिंधुसंगमीं । 'विजयाभिनंदन' नामीं । त्याचा शक दशसहस्र वर्षगामीं । ज्योतिःशास्त्रीं वर्णिला ॥ ४६ ॥ पंचम धारातीर्थीं गौडदेशीं । 'नागार्जुन' असे नाम जयासी । चारलक्ष संवत्सरपर्यंत निश्चयेंसीं । शक तयाचा चालेल ॥ ४७ ॥ षष्ठम कर्नाटकदेशीं करवीर- । पत्तनीं कल्की भविष्यावतार । अठराशें एकवीस संवत्सर । चालेल शक तयाचा ॥ ४८ ॥ ऐका कलिस्वरूप पिशाच्चवदन । कर वामहस्तें धरूनि शिश्न । दक्षिणहस्तें जिव्हा धरून । कलि कलहप्रिय नाचतसे ॥ ४९ ॥ कलियुगीं सूर्यचंद्रग्रहणें जाण । होतील अतिशय प्रमाण । यावत्सूर्यचंद्र अग्नि वरूण । तावत् अल्प धर्म राहील ॥ १५० ॥ मत्स्य कूर्म वराह बौद्ध । कल्की इत्यादि अवतार प्रसिद्ध । या जयंत्यांविषयीं विविध । भिन्नभिन्न मतें असतीं ॥ ५१ ॥ मास पक्ष तिथि नक्षत्र वार । कल्पभेदें जयंतीकाल प्रकार । युगपरत्वें वेगळे विचार । असती जयंतीनिर्णयार्थ ॥ ५२ ॥ पुराण ज्योतिष धर्मशास्त्र । कल्पभेदें इत्यादिकांचे विचार । युगपरत्वें जरी भिन्न तिथि वार । तरी निर्दोष समजावे

॥ ५३ ॥ जयंतीप्रीत्यर्थ उपोषण । उत्साहसमारंभ कीर्तनश्रवण । ब्राह्मणभोजन पुराणपठण । करितां महत्पुण्य होतसे
॥ ५४ ॥ शिष्य विनवी गुरुनाथा । ऐकूनि अवतारचरित्रकथा । परमानंद होतसे चित्ता । पुनरार्त झालों श्रवणासी
॥ ५५ ॥ आणखी कोणकोणते अवतार । झाले असती श्रीगुरुवर । कृपा करूनि सांगा सविस्तर । पुढिले अध्यायीं
रसाल ते ॥ ५६ ॥ स्वस्ति श्रीगुरुलीलामृत । श्रृति स्मृति पुराणसंमत । ब्रह्मनिष्ठ वामनविरचित । तृतीयाध्याय
रसिक हा ॥ ५७ ॥ इति श्रीगुरुलीलामृते गुरुशिष्यसंवादे तृतीयोऽध्याय समाप्तः ॥ ३ ॥ श्रीगुरुदेवदत्त – स्वामीसमर्थ ॥

